वास्तुशास्त्र सर्वांच्या जिव्हाळ्याचा विषय बनला आहे. मानवाच्या प्रगतीसाठी आणि कल्याणासाठी उपयुक्त ठरणारे वास्तुशास्त्र म्हणजे मानवजातीला भारतीय संस्कृतीची देणगी आहे. असे असूनही वास्तुशास्त्राचे शास्त्रशुद्ध विवेचन करणाऱ्या व्यक्ती वा साहित्य मिळणे दुरापास्त बनले आहे. या पार्श्वभूमीवर ठाण्यातील वास्तुशास्त्र रिसर्च फाऊंडेशनचे संस्थापक डॉ. रविराज अहिरराव यांच्या 'वास्तुरविराज' या पुस्तकाविषयी...

'वास्तू'चे 'शास्त्र'शुद्ध विवेचन

गेल्या दहा-पंधरा वर्षांत लोकांमध्ये वास्तुशास्त्राबद्दलचे कुतुहल आणि जागृती मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. तसे पाहता हे शास्त्र किमान दहा हजार वर्षांपूर्वीचे आहे. याचा मूळ उद्देश मानवाचा निसर्गाशी समतोल साधणे आणि निसर्गशक्तीचा लाभ मानवी जीवनात सुख, शांती, समृद्धी आणि दीर्घायुष्य मिळवण्यासाठी करणे हाच आहे. घरगुती समस्यांपासून व्यवसायातील समस्यांपर्यंत सर्व समस्या सोडवण्यासाठी समाजाच्या विविध स्तरांतील लोक वास्तुशास्त्राकडे उपाय म्हणून पाहत आहेत.

वास्तुशास्त्राची वाढती लोकप्रियता पाहून काही बांधकाम व्यावसायिकही आपल्या नवनवीन योजनांमध्ये वास्तुशास्त्राचा समावेश करू लागले आहेत. नेमका याच गोष्टीचा फायदा घेण्यासाठी अर्धवट ज्ञान असलेल्या वास्तुतज्ज्ञांचा जणू सुळसुळाटच झाला आहे. अशा तथाकथित वास्तुतज्ज्ञांमुळे या प्राचीन भारतीय शास्त्राचा गैरवापर वाढला आहे; परंतु काही वास्तुतज्ज्ञ या शास्त्राची निष्ठेने जोपासना करून त्याचा वापर अखिल मानव जातीच्या कल्याणासाठी करत आहेत. ठाण्याच्या 'वास्तुशास्त्र रिसर्च फाऊंडेशन' या संस्थेनेही याच कामाचा वसा घेतला आहे. या संस्थेचे संस्थापक डॉ. रविराज आणि सौ. मंजुश्री अहिरराव यांनी वास्तुशास्त्राच्या उपयोगाबरोबरच त्यावर संशोधन करून ते अधिक समृद्ध बनवण्याचे महत्त्वाचे कार्य हाती घेतले आहे. अहिरराव दांपत्याने वास्तुशास्त्रामध्ये विशेष प्राविण्य मिळवले असून हे शास्त्र केवळ भारतापुरतेच मर्यादित न राहता त्याचा प्रसार जागतिक पातळीवर व्हावा यासाठी प्रयत्न करत आहेत. डॉ. रविराज अहिरराव यांनी जिज्ञासूंसाठी 'वास्तुरविराज' हे पुस्तक प्रकाशित केले आहे. वाचकांना वास्तुशास्त्राचे शास्त्रीय ज्ञान मिळावे आणि तथाकथित भोंदू वास्तुतज्ज्ञांकडून फसगत होऊ नये म्हणून डॉ. अहिरराव यांनी आपल्या गुरुंच्या आदेशानुसार हे पुस्तक लिहिले आहे. मनोगतामध्ये त्यांनी वास्तुशास्त्राचा इतिहास आणि आपण या विषयाकडे कसे वळलो याची विस्तृत माहिती दिली आहे. वास्तुशास्त्रात मानव आणि निसर्ग यांच्या संतुलनाला विशेष महत्त्व दिले आहे. हे संतुलन बिघडले की आपल्याला विविध त्रास सहन करावे लागतात. हे संतुलन पुन्हा पूर्वपदाला आणण्याचे महत्त्वाचे कार्य वास्तुशास्त्र करते. वास्तुशास्त्रात पंचमहाभूते आणि दिशांना अधिक महत्त्व देण्यात येते.

लेखकाने तिसऱ्या प्रकरणात आजवर वास्तुशास्त्रात फारशा चर्चिला न गेलेल्या मुद्यांना स्पर्श केला आहे. त्यात मुलांची शैक्षणिक प्रगती, कुटुंबातील सदस्यांचा व्यक्तिमत्त्व विकास, उच्चपदस्थ व्यक्तींची भरभराट, अध्यात्मिक विकास, कौटुंबिक स्वास्थ्य या सर्व मुद्यांचा वास्तुशास्त्रीय दृष्टीकोनातून विचार केला गेला आहे. चौथ्या प्रकरणात लेखकाने वास्तुशास्त्र विज्ञानावर आधारीत असल्याचे प्रतिपादन केले आहे. कोणत्याही शास्त्राच्या सिद्धतेसाठी काही निकष लागतात. त्यात ते वस्तुनिष्ठ, वंपरता येण्यायोग्य, कायमस्वरुपी, नियमबद्ध, उपयुक्त आणि विश्वव्यापक असणे आवश्यक ठरते. वास्तूशास्त्र हे सर्व निकष पूर्ण करते. त्यामुळे ते एक शास्त्र आहे, हे सिद्ध होते. सूर्यप्रकाशातील अतिनील किरणे (अल्ट्राव्हायलेट रेज) आणि ताम्र किरणे (इन्फ्रारेड रेज) यांचे वातावरणावर आणि आपल्या आरोग्यावर होणारे परिणाम (फायदे आणि तोटे) विषद केले आहेत. पृथ्वीच्या चुंबकीय गुणधर्म आणि गुरुत्वाकर्षणामुळेही वास्तूवर आणि पर्यायाने त्या वास्तुमध्ये राहणाऱ्या व्यक्तींवर होणारे परिणामही त्यांनी मुद्देसूद मांडले आहेत. हे मुद्दे मांडताना लेखकाने वास्तुशास्त्राचे वैज्ञानिक दाखलेही दिले आहेत.

वास्तुशास्त्रात पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण या मुख्य दिशांबरोबरच ईशान्य, आग्नेय, नैऋत्य आणि वायव्य या उपदिशांना सर्वाधिक महत्त्व दिले जाते. या अष्टदिशांचे दिशापालक, त्यांचे वाहन, वास्तव्याचे ठिकाण, आयुध, राशी, रंग आणि ग्रहाधिपतींची इत्यंभूत माहिती 'अष्टदिशा' या प्रकरणात दिली आहे. या माहितीबरोबरच या दिशांचे शुभ आणि अशुभ परिणाम, या दिशांची प्रकृती, त्या-त्या दिशेचे महत्त्व आदी बाबीही चर्चिल्या आहेत. दिशा ओळखण्याचा अचूक मार्ग म्हणजे होकायंत्राचा वापर. वास्तुतज्ज्ञ म्हणून काम करणाऱ्यांसाठी होकायंत्र हे अत्यंत महत्त्वाचे साधन आहे. डॉक्टर स्टेथेस्कोपशिवाय अपूर्ण असतो, त्याचप्रमाणे वास्तुतज्ज्ञही होकायंत्राशिवाय अपूर्णच असतो. अशा अत्यंत उपयोगी होकायंत्राची माहिती, महत्त्व आणि दक्षता डॉ. अहिरराव यांनी एका वेगळ्या प्रकरणात चर्चिली आहे.

आयुर्वेद आणि वास्तुशास्त्र यांचाही जवळचा संबंध आहे. आपले शरीर पंचमहाभूतांपासून बनलेले असते. आयुर्वेदशास्त्रानुसार मानवी शरीरावर तीन प्रमुख गुणांचा प्रभाव आहेत. वात, कफ आणि पित्त या तीन गुणांचा समतोल म्हणजे निरोगी माणूस आणि असमतोल म्हणजे रोगी माणूस. या त्रिगुणांचे विश्लेषण केल्यास असे दिसते की, कफ म्हणजे पृथ्वी व जलतत्त्व, पित्त म्हणजे अग्नी व जलतत्त्व आणि वात म्हणजे वायू व आकाशतत्त्व. वास्तुशास्त्रात पंचतत्त्वांना विशेष महत्त्व असते. अशा प्रकारे डॉ. अहिरराव यांनी वास्तुशास्त्र आणि आयुर्वेदाचा संबंध मांडला आहे.

आपल्या वास्तुत वास्तुदोष आढळल्यानंतर विविध उपाय करून घेण्यासाठी वास्तुतज्ज्ञाची गरज भासते. हा वास्तुतज्ज्ञ खरोखरच तज्ज्ञ आहे की त्याने केवळ एक-दोन पुस्तके वाचून व्यवसाय सुरू केला आहे, हे ओळखण्यासाठी लेखकाने काही मार्ग सुचवले आहेत. या सर्व मूलभूत माहितीनंतर लेखकाने वाचकांच्या जिव्हाळ्याचा विषय मांडला आहे. त्यात भू-परीक्षण, भूखंडाचे आकार आणि भूखंड निवडताना घ्यावी लागणारी काळजी हे सर्व नमूद केले आहे. त्यानंतर विविध वस्तूंचे म्हणजे घर, दुकान, कार्यालय (ऑफिस), कारखाने, हॉटेल, शैक्षणिक संस्था, रुग्णालय, बँक, मंदीर यांचे आदर्श वास्तुशास्त्रीय मुद्दे दिले आहेत. वाचकांना आपले घर वास्तुशास्त्रीय दृष्टीकोनातून परिपूर्ण असावे, असे वाटणे साहजिक आहे. त्यामुळे लेखकाने घरातील प्रवेशद्वारापासून दिवाणखाना, स्वयंपाकघर, शयनगृह, देवघर, स्नानगृह, शौचालय आदी विभागांची विशेष दखल घेतली आहे. वास्तूमध्ये काही त्रुटी आढळल्यास त्यावर खर्चिक उपाय करण्यापेक्षा तोडफोडीविना करता येण्यासारखे उपाय सुचवले आहेत.

वास्तुशास्त्रावरील इतर पुस्तके एकतर किचकट असतात किंवा त्यामध्ये तपशीलवार माहिती नसते. हे पुस्तक वास्तुशास्त्राची तपशीलवार आणि सोप्या पद्धतीने माहिती देणारे असल्याने नक्कीच संग्राह्य ठरते.

(पुस्तकाचे नाव 'वास्तुरविराज,' डिम्पल पब्लिकेशन, पृष्ठे : २७१, किं. : ३२० रुपये)

– महेश जोशी